2022-23

Impact Factor 5.855 p-ISSN 2454-7409 e-ISSN 2582-5305

डॉ. भाऊ मांडवकर संशोधन केंद्र आणि
संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ मराठी प्राध्यापक परिषद यांचा संयुक्त उपक्रम

# मराठी प्राध्यापक संशोधन पत्रिका

## (MPSP)

Peer Reviewed Annual National Research Journal as per UGC Guidelines
VOL 8 ISSUE 1 January 2023
वर्ष आठवे, अंक पहिला, जानेवारी २०२३

**मुख्य संपादक**
डॉ. पवन मांडवकर
संस्थापक अध्यक्ष, डॉ. भाऊ मांडवकर संशोधन केंद्र
अध्यक्ष, सं.गा.बा. अमरावती विद्यापीठ मराठी प्राध्यापक परिषद तसेच प्राचार्य, इंदिरा महाविद्यालय, कळंब
**Chief Editor**
**Dr. Pavan Mandavkar**
Chairman, DBM Research Centre
President, Sant Gadge Baba Amravati Vidyapeeth Marathi Pradhyapak Parishad, Amravati
Address: Principal, Indira Mahavidyalaya, Kalamb, Dist. Yavatmal, Maharashtra, India 445 401
E Mail: marathipradhyapak@gmail.com Mobile No: +91-9422867658

**सहसंपादक व प्रकाशक**
प्रा.डॉ.सौ. वीरा मांडवकर
संचालक, डॉ. भाऊ मांडवकर संशोधन केंद्र
इंदिरा महाविद्यालय, कळंब, जि. यवतमाळ ४४५४०१
**Associate Editor & Publisher**
**Dr. Mrs. Veera Mandavkar**
Director, DBM Research Centre
Address: Indira Mahavidyalaya, Kalamb, Dist. Yavatmal, Maharashtra, India 445 401
E Mail: veeramandavkar18@gmail.com Mobile No: +91-9403014885

**संपादक मंडळ Editorial Board**
प्रा. रेखा वाठ, डॉ. गणपत उरकुदे, प्रा. नीलकंठ नरुले, प्रा. सरोज लखदिवे, डॉ. कैलाश नेमाडे
1. **Prof. R.M. Wath,** Address: Indira Mahavidyalaya, Kalamb, Dist. Yavatmal 445 401 (India)
E mail: rekhawath23@gmail.com Mobile No.: +91-9422153353
2. **Dr. G.P. Urkunde,** Address: Indira Mahavidyalaya, Kalamb, Dist. Yavatmal 445 401 (India)
E mail: urkundeganpat@gmail.com Mobile No.: +91-9765034097
3. **Prof. N.V. Narule,** Address: Indira Mahavidyalaya, Kalamb, Dist. Yavatmal 445 401 (India)
E mail: narulenilkantha3@gmail.com Mobile No.: +91-9923909296
4. **Prof. S.Y. Lakhadive,** Address: Indira Mahavidyalaya, Kalamb, Dist. Yavatmal 445 401 (India)
E mail: saroj20lakhadive@gmail.com Mobile No.: +91-9420199479
5. **Dr. K.R. Nemade,** Address: Indira Mahavidyalaya, Kalamb, Dist. Yavatmal 445 401 (India)
E mail: krnemade@gmail.com Mobile No.: +91-7020242364

# अनुक्रमणिका


| | | | |
|---|---|---|---|
| १ | दलितेतर समीक्षकांची दलित कथासमीक्षा | डॉ. कैलास सोनू महाले | ५–९ |
| २ | लोकविधी धोंडी | प्रा.डॉ. शरद जानराव वाघोळे | १०–१३ |
| ३ | संतांचा भाषा विचार | प्रा. डॉ. गजानन रा. लोहवे | १४–१७ |
| ४ | धनगर समाजाचे मेंढरांमागच्या भटकंतीमय जीवनातील आर्थिक प्रश्न | डॉ. संदीप वाकडे | १८–२१ |
| ५ | जागतिकीकरणात मराठी लोककलांचे स्थान | प्रा. दिलीप महादू कोने | २२–२६ |
| ६ | भटक्या विमुक्तांच्या शैक्षणिक समस्या | डॉ. विजयकुमार आर. खंदारे | २७–३० |
| ७ | पदवी व पदव्युत्तर स्तरावरील मराठी ग्रामीण कथेचे अध्यापन : स्वरूप व कौशल्य | प्रा.डॉ. नरसिंग कदम | ३१–३४ |
| ८ | प्रवासवर्णन वाङ्मयप्रकाराचे विशेष | प्रा.डॉ. प्राजक्ता निकम | ३५–४१ |
| ९ | बदलते सामाजिक, राजकीय, आर्थिक संबंध व बाबाराव मुसळे यांची कथा (मोहरलेला चंद्र, झिंगू लुखू लुखू) | डॉ. गजानन भाऊराव धोंगटे | ४२–४४ |
| १० | नव्वदोत्तरी काळातील दलित आत्मकथने : स्वरूप, विशेष | सहा. प्रा. उषा पाटील | ४५–४९ |
| ११ | स्त्री जाणिवांचा धगधगता आलेख : भीषण गर्भ हवा (मलिका अमर शेख) | डॉ. मीनाक्षी बऱ्हाटे | ५०–५३ |
| १२ | सामाजिक क्रांतीचे अग्रदूत महात्मा फुले यांचे कार्य | प्रा. डॉ. प्रमोद दामोदर देवके | ५४–५६ |
| १३ | राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांच्या साहित्यातील जनवचनांचा सामाजिक प्रभाव | डॉ. पवन मांडवकर | ५७–६० |
| १४ | शाहू ,फुले, आंबेडकर यांचे शैक्षणिक विचार | प्रा. मदने रोहिणी बबन | ६१–६४ |
| १५ | प्राचीन मराठीचा समृद्ध ठेवा - मोडी लिपी | डॉ. सौ. वीरा मांडवकर | ६५–६९ |
| १६ | लोकसाहित्याच्या अभ्यासाचे महत्त्व | प्रा.डॉ. मीनाक्षी रा. देव निमकर | ७०–७४ |

# संतांचा भाषा विचार

प्रा. डॉ. गजानन रा. लोहवे
मराठी विभाग प्रमुख
बाबासाहेब देशमुख पारवेकर महाविद्यालय, पारवा, ता. घाटंजी, जि. यवतमाळ
भ्रमणध्वनी - 8275291420

**प्रस्तावना :**

संतांचे व्यक्तित्व आणि कर्तुत्व मानवी जीवनाच्या सर्वांगाला स्पर्शुन जाणारे आहे. संतांच्या कार्याचे विविध पैलू शोधत असताना त्यांची भाषा विषयक दृष्टी ही अत्यंत महत्त्वाची आहे. किंबहुना सध्याच्या इंग्रजीच्या आक्रमण काळात तर ते क्रांतिकारी पाऊलच वाटते. समाजाचा विकास हा त्यांच्याच स्वभाषेतून अधिक परिणामकारक पद्धतीने होत असतो. म्हणूनच संतांनी समाज जागृतीसाठी लोकभाषेचा आग्रह धरला. संस्कृतात बंदिस्त झालेल्या ज्ञानाला लोक भाषेतून बहुजन समाजापर्यंत पोहोचविण्याचे कार्य ज्ञानदेवादी संतांनी केले. बहुजन समाजाच्या उद्धारासाठी कधी संस्कृतचा तिरस्कार करून तर कधी लोकभाषेचा भक्कम पुरस्कार करून त्याद्वारे समाजाला नवचेतना दिली. ही संतांची भाषिक क्रांतीच होती. संतांच्या या भाषिक विचाराचा शोध प्रस्तुत लेखात घेतला आहे.

संतांचा विचार साधारणतः धर्म आणि अध्यात्मा संदर्भातच केला जातो. हे मात्र योग्य नाही. संतांचे कार्य यापेक्षा अधिक आहे.

'जगाच्या कल्याणा संतांच्या विभूती | देह कष्टविती उपकारे||'

हे जीवित कार्य घेऊन संत समाजाला प्रेरणा देतात. 'कारणाविना प्रीती ऐसे कळवळ्याची जाती' या न्यायाने संत समाज प्रबोधन करतात. भक्तीचा महिमा गात असतानाच समाजाला योग्य दिशा देण्याचे ते कार्य करतात. संत अशिक्षित असतील पण दृष्टे होते. निरक्षर असतील पण ज्ञानी होते. समाजाकडे पाहण्याचा त्यांचा दृष्टिकोन सुधारकांचा होता. त्यांच्या प्रत्येक कृतीत दूरदृष्टी तर होतीच शिवाय संस्कृती, समाज, प्रदेश आणि भाषेसंदर्भात तळमळ नि जाज्वल्य अभिमानही होता. समाज प्रबोधनासाठी त्यांनी लोकभाषेचा यथार्थपणे वापर केला. स्वभाषेतून लोकसंस्कृतीचे संवर्धन तर होते शिवाय लोक जागृती ही अधिक परिणामकारक होते. भाषा ही समाजाची अस्मिता असते याची जाणीव संतांना होती. संतांचा भाषा विषयक विचार अधिक प्रगल्भ आणि दुरगामी परिणाम करणारा होता. या संत मालिकेत माहानुभावी, वारकरी आणि कबीरासारखे संत अग्रेसर दिसतात. महाराष्ट्रामध्ये 12 व्या शतकापासून जी समाजामध्ये सामाजिक, धार्मिक आणि सांस्कृतिक क्रांती झाली याचे काही श्रेय संतांच्या जाणीवपूर्वक भाषिक आग्रहाला आणि प्रचाराला जाते.

**संत ज्ञानेश्वर**

भगवद्गीतेचे संस्कृतातील तत्त्वज्ञान साध्या सोप्या भाषेत मांडून संत ज्ञानेश्वरांनी भाषिक क्रांती तर केली सोबतच धर्मांधतेमुळे गीता ज्ञानाला दुरावलेल्या जीवांना ज्ञानाची द्वारे खुली केली. ज्ञानेश्वरांच्या घरी आणि त्यांच्या समाजामध्ये पिढ्यानपिढ्या संस्कृत भाषा बोलली जायची. सामान्य जनता मात्र संस्कृत भाषा आणि ज्ञानापासून अनभिज्ञ होती. ज्ञानेश्वरांनी सर्वप्रथम मराठीचा आग्रह धरून संस्कृतीतील ज्ञान मराठीत आणले. मराठी भाषेची सखोलता, व्यापकता, उत्तुंगता ज्ञानदेवांनी पदोपदी सांगितली आहे. भाषिक अस्मितेचा प्रयोग करून मराठी भाषेचा गौरव केला आणि तिच्या बालवयातच तिला तत्त्वज्ञान, अध्यात्म, वस्तुममिमांसा पचविण्याचे सामर्थ्य प्राप्त करून दिले. मराठी भाषा अध्यात्म आणि तत्वज्ञान यांना समर्थपणे पेलणारी आहे. तिच्यात माधुर्य

आहे याचा प्रत्यय सर्वप्रथम ज्ञानेश्वरांनी आणून दिला. ज्ञानेश्वर महाराजांना मराठी भाषेचा जाज्वल्य अभिमान होता. तो पुढील ओवीतून व्यक्त होताना दिसते.

'माझा मराठीचा बोलू कौतुके ।
परी अमृतातेही पैजा जिंके।
ऐसी अक्षरे रसिके मिळविणे।।'

मराठी भाषेचा गोडवा आणि शब्दांचे सामर्थ्य एवढ्या ताकदीने क्वचितच कोणी गायले असतील. सामान्यजणांना संस्कृतातील गीतेचे तत्वज्ञान अवगत होत नसल्याने ते अज्ञानी आहेत त्यांना ज्ञानी करण्यासाठी गीतेला मराठीत करण्याचा आदेश ज्ञानेश्वरांना गुरुबंधूंनी दिला व तो प्रमाण मानून ज्ञानेश्वराने गीता मराठीत आणली. संस्कृत वाणी ही देवांची वाणी आहे माझ्या माय मराठीची ती आई आहे असे म्हणून ज्ञानेश्वरांनी संस्कृतचा गोडवा गायला. असे असले तरी सर्वसामान्यांच्या उद्धारासाठी त्यांनी मराठीचा पुरस्कार केला. मराठीच्या प्रचंड आत्मविश्वासाने आणि श्रद्धेने ज्ञानेश्वर म्हणतात "मी माझ्या मायबोलीत सौंदर्य आणि रसाळपणा निर्माण करीन, अमृतालाही जिंकेल अशा गोड शब्दांमध्ये मी गीतेचा भावार्थ सांगेन त्यामुळे कानाला जीवा फुटतील डोळ्यांना तृप्ती मिळेल मराठी भाषेविषयी इतका आत्मविश्वास आणि अभिमान विरळाच दिसतो.

ज्ञानेश्वरांनी संस्कृतचे महात्म्य मान्य केले होते. संस्कृत मधील ज्ञानाची हे महात्म्य त्यांनी मान्य होते. ही परंपरावादी विचारसरणी आपण जरी मान्य केली तरी ज्ञानेश्वरांनी गीतेच्या तत्त्वज्ञानाला आसुसलेल्या सर्वसामान्य जणांना मराठीत गीता तत्त्वज्ञान आणून नवेज्ञानाचे आणि मोक्षाची शिदालन उघडे करून दिले होते या अर्थाने ज्ञानेश्वरांचे भाषिक कार्य अधिक महत्त्वाचे वाटते. त्यापेक्षाही एका संताने जाणीवपूर्वक भाषिक विचार मांडावेत यात ज्ञानेश्वरांचे निश्चितच मोठेपण मान्य करावे लागते. संस्कृतचे महत्त्व मान्य करीत असतानाच मराठी भाषेचे समांतर महत्त्व हे त्यांनी प्रतिपादन केले.

"तिरे संस्कृताची गहने ।
तोडूनी मराठीया शब्दसोपाने ।।
रचिली धर्मनिधाने तिष्टती देवे।

अर्थात संस्कृत भाषा म्हणजे ब्रह्मविद्या. जीवाला सुखावण्याचे आणि ज्ञानी करण्याचे सामर्थ्य ब्रह्मविद्येत आहे पण ते समजत नसल्याने मराठीचा अवलंब करून मी ब्रह्म विद्येचा सुकाळ करेन आणि संस्कृतातील तत्त्वज्ञान मराठी, प्राकृत मध्ये सहज सोपे करून सांगेल . हा विश्वास ज्ञानेश्वरांना होता ज्ञानेश्वरांजवळ शब्दांची श्रीमती होती म्हणूनच माझ्या जीवनात शब्दाने इतके मोठेपण कशालाही नाही असे ज्ञानेश्वर म्हणतात सहज पाहिले तर शब्द केवळ कानांचा विषय आहे; परंतु जिव्हा म्हणते की हा शब्द माझा रस विषय आहे .नाकाला असे वाटते की या शब्दांच्या संघाने मला सुवास मिळाला. शब्दच सुहास आणि रस व्हावा एवढी रसाळता सुगंध मराठी भाषेत आहे आणि ही श्रद्धा, आत्मविश्वास संत ज्ञानेश्वरांमध्ये आहे म्हणूनच ज्ञानेश्वरांच्या भाषेत विचार महत्त्वाचा ठरतो. संत एकनाथांनी सुद्धा मराठी भाषेचा पुरस्कार केलेला दिसतो.

## महात्मा चक्रधर स्वामी

बाराव्या शतकाच्या उत्तरार्धात मानवतावादी विचारवंत म्हणून उदयास आलेले आणि आजतागायत आपल्या विचाराने संपूर्ण महाराष्ट्रभर प्रभाव टाकणारे थोर संत म्हणजे महात्मा चक्रधर स्वामी होईल चक्रधरांचा महानुभाव पंथ वैदिक पतत्वज्ञानापेक्षा वेगळ्या आणि पुरोगामी होता.वैदिकांचे अद्वैत्वज्ञान चक्रधरांना मान्य नव्हते. द्वैती तत्त्वज्ञान घेऊन यज्ञयाग, हिंसा आणि जातीभेद उच्चाटनाचा प्रयत्न करणारे चक्रधर अवैदिक होते. कर्मकांड, यज्ञ यातून माणसाची सुटका व्हावी आणि निरामय माणूस निर्माण व्हावा यासाठी चक्रधरांनी अखंड प्रयत्न केले. चक्रधरांचे कार्य हे धार्मिक आणि सामाजिक तर आहेच त्यापेक्षा मराठी भाषेचा अभिमान व्यक्त

करणारे आणि मराठीच्या संवर्धनासाठी जाणीवपूर्वक प्रयत्न करणारे आहे. अवैदिक तत्वज्ञानामुळे महानुभाव पंथ सर्वसामान्य माणसाला अधिक जवळचा आणि उद्धार करता वाटत होता. म्हणूनच महात्मा चक्रधरांनी लोक जागृती आणि लोककल्याणासाठी लोकभाषेचा वापर केला एकदा केशराजांनी नागदेवाचार्यापुढे चक्रधरांच्या सूत्र पाठातील उद्धरण संस्कृत बांधण्याचा विचार मांडला. त्यावर नागदेवाचार्यांनी दिलेले उत्तर मराठी भाषेच्या प्रचार, प्रसार आणि विकासाला प्रोत्साहन देणारे आहे. नागदेवाचार्य म्हणाले,' नको का केशव देया, येणे माझीया म्हातारीया नागवतील' चक्रधरांचे पर्यायाने मानभाव पंथाचे तत्वज्ञान निरूपणासाठी मराठीचाच वापर करावा यावर या पंथाचा विशेष कटाक्ष होता. दुसऱ्या एका प्रसंगात केशराजांनी नागदेवाचार्यांना संस्कृत भाषेत प्रश्न केला तेव्हा त्यांना ते स्पष्टपणे म्हणाले, की पंडिता केशव देया तुमचा आस्मात कस्मात मी नेणे गा: मज श्री चक्रधर निरुपिली म-हाठी: तिळाची पुसा" दैनंदिन जीवनात मराठीच वापरली जावी हा महानुभाव पंथाचा खास आग्रह असल्याने मुस्लिम आक्रमण काळात सुद्धा मराठी जिवंत आणि जातिवंत राहिली याचे श्रेय महानुभाव पंथाला विशेष जाते.

## संत नामदेव

वारकरी संत परंपरेचे अधिकारी म्हणून संत नामदेवाचे स्थान संत मालिकेत आढळ आहे. जातीभेद, अस्पृश्यता, कर्मकांड आणि धर्मांधतेच्या काळात धार्मिक क्षेत्रात का होईना समानतेचा मंत्र संत नामदेवांनी दिला. संत नामदेव हे बहुजन समाजातून आल्यामुळे त्यांची भाषा ही बहुजनांची भाषा होती. संत नामदेवांचा वेदादिकांचा त्याचप्रमाणे बुद्धाचाही अभ्यास होता. त्यांच्या अभंगात आलेला बुद्धाचा उल्लेख हा त्यांनी प्रतिपादलेल्या समानतेच्या तत्वाशी मेळ घालणारा आहे. त्यामुळे संत नामदेव हे विद्वान होते यात शंका नाही. तरीसुद्धा त्यांचा भाषिक दृष्ट्या विचार करीत असताना त्यांना संस्कृत भाषा अवगत होती काय? हा प्रश्न निर्माण होतो. याचे फार संदर्भ मिळत नाही. असे जरी असले तरी संत नामदेवांनी समाजप्रबोधनासाठी लोकभाषेचा वापर केला यामुळे तत्कालीन भाषेला तर महत्त्व आलेच त्यासोबतच संत नामदेवांच्या संतत्वामुळे बहुजन समाजात अनेक संत निर्माण झाले. ते संत त्यांची त्यांची भाषा घेऊन आपल्या वेदना, दु:ख समाजसमोर मांडू लागले. पर्यायाने त्या त्या जातीतील, व्यवसायातील शब्द भाषेमध्ये प्रविष्ट झाले. हे भाषाभिवृद्धीसाठी आवश्यक असते. हे भाषिक कार्य संत नामदेवांच्या अभंगाने त्यांच्यातील संतत्वाने केले असे म्हणता येईल. समाज प्रबोधन करताना संत नामदेव विषयानुरूप शब्दयोजना करीत असतात. त्या त्या क्षेत्रातील विशिष्ट परिभाषिक शब्द योजित असत हे त्यांचे वैशिष्ट्य होईल. उदाहरणार्थ: "आम्ही कीर्तन कुळवाडी। आणिक नाही उदीम जोडी ।।वाचा पिकली पिकली । हरिनामाची दृष्टी झाली ।।"

अशाप्रकारे जहाज व्यवसायातील, शेती संदर्भातील शब्द नामदेव वापरतात. आपला आशय प्रभावी व परिणामकारक ठरवा, ऐकणा-यांच्या ह्दयाचा ठाव घ्यावा यासाठी संत नामदेवांनी लोक भाषेतून रचना केली आहे. याचा परिणाम असा झाला की महाराष्ट्रामध्ये संत नामदेवांची वाणी प्रसिद्ध तर झालीच शिवाय पंजाबमध्येही गुरुग्रंथसाहेब या धर्मग्रंथामध्ये 'नामदेव की मुखबानी' म्हणून अजरामर झाली. लोक भाषेतून लोककल्याण प्रभावीपणे सांगता येते याचे उत्तम उदाहरण म्हणजे संत नामदेव होय.

## संत तुकाराम

महाराष्ट्राच्या ह्दयात भरभरून घर करून जर कोणता संत असेल तर तो म्हणजे संत तुकाराम होय. तुकारामांच्या अभंगाची लोकप्रियता त्यांच्या विद्रोही युगप्रवर्तक विचारात आहे यासोबतच युगाने युगे अज्ञानाच्या अंधकारात ठेवणाऱ्या ढोंगाला आव्हान देणाऱ्या प्रत्ययकारी व प्रलयकारी भाषेत आहे. संत ज्ञानेश्वरांनी भाषेचा रसायपणा गायला तर संत तुकारामाने भाषेला अन्यायाला ठेचणारे प्रभावी माध्यम मानले. संत तुकाराम हे युग प्रवर्तक संत कवी व समाज सुधारक. संत तुकारामांनी अज्ञान, अंधश्रद्धा, बुवाबाजी व ढोंगीपणा यात बुडालेल्या

समाजाला परिवर्तनाचा विचार दिला. माणुसकीला पालवी फुटणारी नवी अमृत कळा दिली. बुरसटलेल्या विचाराला गाडून डोंगराच्या बुरख्याला फाडून नवी विचाराची मुहूर्तमेढ संत तुकोबांनी रोवली.

संत तुकारामांच्या या सामाजिक कार्याचा विचार करत असताना भाषिक विचारही करता येतो. संत तुकारामांनी तेव्हाच्या ज्ञान भाषेला अर्थात संस्कृतला नाकारुन लोकभाषेचा पुरस्कार केला का? हे शोधत असताना तुकारामांचा भाषाविषयक दृष्टिकोन स्पष्टपणे त्यांच्या अभंगात दिसत नाही. समाज आर्थिक, सामाजिक आणि धार्मिक विवंचनेत एवढा रुतला होता की त्यांचा भाषिक विचार करावा ही तेव्हाची आवश्यकताच नव्हती. मात्र जेव्हा तुकाराम "वेदांचा तो अर्थ आम्हासीचा ठावा । येरांनी वाहावा भार माथा।।' असे म्हणतात तेव्हा वेदपठनाच्या मताधिकाऱ्यासोबतच वेदांची भाषा ही अप्रत्यक्षपणे नाकारतात आणि सामान्य व्यक्ती व्यवहारात ज्या बोलीभाषेचा वापर करतात. त्या भाषेच्या साह्याने वेदांचा अर्थ सांगण्याचा प्रयत्न करतात. त्यामुळेच वेदांचे अगम्य असे तत्त्वज्ञान व्यवहारातल्या नित्यनेमाने बोलल्या जाणाऱ्या शब्दात तुकोबा सांगू लागल्याने त्यांची वाणी परिणामकारक होऊ लागली. अशा नकारातून संत तुकारामांनी लोक भाषेचा पुरस्कार केलेला दिसतो. तुकाराम शब्दप्रभू होते. त्यांच्या अभंगांचे परिशीलन केल्यास असे लक्षात येते की संत तुकाराम अचूक शब्दांची निवड तर करतातच पण प्रतिमांची चढती कमान भाषा विद्वानालाही लाजवेल अशी उभी करतात. शब्दांचे महत्त्व, महात्म्य वर्णन करताना तुकाराम म्हणतात 'आम्हा घरी धन शब्दांचीच रत्ने, शब्दांचीच शस्त्रे यत्न करू ।' यासारख्या अभंगातून भाषेचे महत्त्व तुकाराम सांगतात. शब्दांनीच क्रांती घडते की जी शस्त्राने ही घडणार नाही. शब्दानेच शांती ही नांदते की जी कायद्यानेही नांदणार नाही. शब्दांनीच प्रीती जडते आणि शब्दानेच नातेही तुटते ते शब्दांचे सामर्थ्य संत तुकाराम जाणून होते संत तुकारामांच्या अभंगात मराठमोळा समाज आजही नाही याचे कारण तुकारामांची सुभाषितांची, हृदयाला हात घालणारी भाषा होय.

**निष्कर्ष :**

१. मुस्लिम आक्रमणाच्या काळात संतांनी लोक भाषेचा वापर करून त्या माध्यमातून भक्तिमार्ग अधिक बळकट केला.

२. समाज जागृतीचे ध्येय साकार करण्यासाठी संतांनी संस्कृतला नाकारून मराठी या लोकभाषेचा जाणीवपूर्वक वापर केला.

३. ज्ञानदेवांची भाषा मराठी ही संस्कृतचे महात्म मान्य करून तिच्या छत्रछायेखाली वाढणारी संस्कृतच्या प्रभावाखाली होती. याचे कारण 'ज्ञानाचा एका' या विचार परंपरेत दिसते.

४. महात्मा चक्रधरांची भाषा ही ज्ञानदेव समकालीन असली तरी अवैधिक धर्माच्या पुरस्कारातून आलेली असल्याने अस्सल बहुजनांची होती त्यामुळे या भाषेत विविध जाती धर्माचे शब्द आलेले आहेत.

५. महात्मा चक्रधर जेवढे मराठीचे अभिमानी होते तेवढे कोणतेही संत दिसत नाही. संत ज्ञानेश्वर नाथपंथाच्या प्रवाहातील असल्याने गोरक्षनाथांच्या लोकभाषेचा आग्रहाचा प्रभाव त्यांच्यावर जरी असला तरी तुलनात्मक चक्रधरांनी मराठीचा खास आग्रह धरलेला होता.

६. 'नाम्याचा तुका' या विचार परंपरेतून भाषिक विचार करत असताना या संतांनी लोकभाषेतून आपल्या विचारांचा प्रसार व प्रचार करणे पसंत केले संत नामदेवांच्या धार्मिक नेतृत्वामुळे विविध जाती धर्मातील अनेक संत आपआपली जात बोली, व्यवसाय बोली, घेऊन आले. मराठी भाषाभिवृद्धीच्या दृष्टीने संत नामदेवांचे हे कार्य विशेष उल्लेखनीय वाटते.

७. संतांनी लोक जागृतीसाठी लोकभाषा ही जाणीवपूर्वक वापरली असल्याने समाजजागृतीमध्ये संतांच्या विचारा सोबतच भाषेचाही मोठा वाटा आहे

❖❖❖

2022-23

Impact Factor-8.575 (SJIF)

ISSN-2278-9308


# B.Aadhar

Single Blind Peer-Reviewed & Refreed Indexed

Multidisciplinary International Research Journal

FEBRUARY 2023

## New Directions in Humanities




Chief Editor
Prof. Virag S. Gawande
Director
Aadhar Social
Research & Development
Training Institute Amravati

Editor
Dr. Pradnya S. Yenkar
Principal,
Vidya Bharati Mahavidyalaya,
Camp, Amravati

This Journal is indexed in :
- Scientific Journal Impact Factor (SJIF)
- Cosmos Impact Factor (CIF)
- International Impact Factor Services (IIFS)

For Details Visit To : www.aadharsocial.com

Aadhar Publications

| | | |
|---|---|---|
| 21 | A study of Coping Strategies of Frontline and Non-Frontline workers. **Dr. S.D. Wakode ,Vanita Sachin Raut** | 7 |
| 22 | Impact of Residence and Gender on Cognitive Emotion Regulation Strategies **PravinkumarA.Mohod , Dr.ShafiqYusufkhan Pathan** | 8 |
| 23 | मध्ययुगीन मराठी गद्य साहित्यातील संवाद शैलीचे स्वरूप डॉ. अण्णा वैद्य | 87 |
| 24 | जनसाहित्य संशोधन पद्धती डॉ. दिनेश की. राऊत | 91 |
| 25 | मराठी समकालिन साहित्य विचारातील नवे प्रवाह प्रा विक्रांत कृष्णराव मेश्राम | 94 |
| √26 | कोरोनोत्तर शैक्षणिक स्थिती प्रा.डॉ.गजानन रामचंद्र लोहवे | 98 |
| 27 | पारधी समाजाची संस्कृती आणि पारधी स्त्रियांची स्थितिगती कु.सारिका विष्णुपंत बनवे | 101 |
| 28 | भारतीय संविधानातील कलम 21 अंतर्गत आरोग्याचा अधिकार : एक विश्लेषण डॉ. विजय रा. हेंगळे | 105 |
| 29 | 'भारतीय स्त्रीयांचे दृष्टीने मानवतावादी स्थान एक अभ्यास' प्रा. डॉ. टि. डी. राजगुरे | 112 |
| 30 | मानव्य विज्ञानातील नवी दिशा संदीप महादेवराव हाडोळे | 115 |
| 31 | आंबेडकरी गेय कवितेतील मूल्यदर्शन प्रा.डॉ. संजय शेजव | 118 |
| 32 | दलित आत्मकथनातील स्त्री-पुरुष संबंध **डॉ. गजानन बनसोड** | 128 |
| 33 | समकालीन लेखिकेच्या कादंबरीतील स्त्री नायिका आणि जीवनचित्रण (मेघना पेठे, कविता महाजन,अरुणा सबाने) तोष्णा बी.बोंदाडे (मोकडे) , प्रा.डॉ. गजानन बनसोड | 131 |
| 34 | संसर्गजन्य रोगामुळे मानसिकतेवर परिणाम होऊन जीवनशैली विस्कळीत – एक विश्लेषण प्रा. ए. एम. वानखडे | 134 |
| 35 | राष्ट्रसंतांनी मांडलेला मानवतावादी विचार एक चिकित्सक अभ्यास प्रा. अनुप अरुण नांदगावकर | 136 |

B.Aadhar' International Peer-Reviewed Indexed Research Journal
Impact Factor -(SJIF) -8.575, Issue NO-390-A
ISSN : 2278-9308
February, 2023

# कोरोनोत्तर शैक्षणिक स्थिती

प्रा.डॉ.गजानन रामचंद्र लोहवे
मराठी विभाग प्रमुख बाबासाहेब देशमुख पारवेकर महाविद्यालय पारवा, ता.घाटंजी जि.यवतमाळ.
मो.८२७५२९१४२०

प्रस्तावना:

एखादया संकटाने सारे जग भयभीत व्हावे अशी कोरोनाने भीती निर्माण केली होती. वित्तहानी सोबत प्रचंड जीवितहानी तर झालीच शिवाय मन–मेंदुवर दुरगामी परिणाम झाला. अर्थव्यवस्था आज रूळावर आली असली तरी अनेक व्यवस्था कोलपडल्या तर काहींवर कायमस्वरूप परिणाम झाला. कोरोनाने जर कोणते क्षेत्र पार बदलून गेले असेल तर ते म्हणजे शिक्षणक्षेत्र होय. देशाची प्रगती ही त्या देशाच्या शिक्षणव्यवस्थेवर अवलंबून असते. ती किती आधुनिक आणि विज्ञानवादी आहे आणि व्यक्तीच्या बुद्धीला चालना देणारी व त्याप्रकारची समाजव्यवस्था निर्माण करणारी आहे त्यावरून त्या देशाचे भवितव्य ठरविल्या जाते. कोरोनाने शिक्षणावरच आघात केल्याने शिक्षण घेणारी पिढीच हतबल झाली काय? अशा अनेक प्रश्नांचा वेध घेत, दुष्परिणामांची चर्चा करत त्यावर आपल्याला उपायही शोधावे लागतील. याची चर्चा प्रस्तुत लेखामध्ये केली आहे.

कोरोना–१९ या संसर्गजन्य रोगाने सारे जग हवालदिल झाले होते. भारतासह अनेक देशांमध्ये कोरोनाने थैमान घातले. सबंध जीवनभर मी आणि माझं म्हणणारा माणूस भयभीत झाला होता. मीपणाचा अहंकार आणि 'माझा' मागील स्वार्थ निमाला होता. सत्ता आणि संपत्तीची सत्ता गळून पडत होती. माणसांध्ये राहणारा 'सामाजिक माणूस' माणसांना टाळू लागला. आप्त, मित्र आणि रक्तसंबंधही शत्रुसारखे वावरू लागले होते. कोरोनाने माणूस कसा 'सामाजिक अंतर' ठेवू लागला आणि तो आता एकटा कसा पडला हे कळलेच नाही. माणसांप्रमाणे संपत्तीवरचाही त्याचा विश्वास उडाला. त्याला ते क्षणभंगुर वाटू लागले. जगणे तेवढे महत्वाचे बाकी सगळे निरर्थक आणि दुय्यम भासू लागले. यात माणसे दुरावली, व्यवसाय कोलमडले, अर्थकारण बिघडले आणि शैक्षणिक व्यवस्था तर पार खिळखिळी झाली. कोरोनामुळे बिघडलेली समाजाची घडी पुन्हा रूळावर आली, मात्र काही व्यवस्था ज्या समाजावर दुरगामी परिणाम करणाऱ्या होत्या त्या विस्कटल्या. त्यात कित्येक पिढयांचे नुकसान झाले. पर्यायाने समाज आणि देशाचेही नुकसान झाले. कोरोनाचा सर्वाधिक परिणाम ज्यावर झाला असेल ती म्हणजे शिक्षणव्यवस्था होय.

भारतीय शिक्षण व्यवस्था ही गुरू–शिष्य या प्रत्यक्ष संबंधाची, संवादाची आणि भौतिकरित्या अध्ययन–अध्यापनाची आहे. ऑनलाईन शिक्षणाची भारतीय व्यवस्थेला सवय नव्हती. गुरू–शिष्य सहवास, संबंधातून छानपैकी शिक्षण चालू होते. मात्र कोरोनाने हे चित्रच पालटून टाकले.

ऑनलाईन शिक्षणाने विदयार्थ्यांच्या हातात मोबाईल दिला, लॅपटॉप दिला तसाच तो वर्क फ्राम होमच्या नावाखाली कर्मचाऱ्यांनाही अत्यावश्यक केला. शिक्षण आणि विद्यार्थ्यांनाही ऑनलाईन शिक्षणाची सवय नव्हती. त्यामूळे ऑनलाईन शिक्षणपद्धती ही थोपविल्यासारखी बळजबरीने स्वीकारावी लागली. बरे त्यासाठी प्रचंड विस्तार आणि लोकसंख्या असलेल्या आपल्या देशात त्या प्रमाणात नेटवर्कची व्यवस्था नव्हती. खेडयांच्या देशात आदिवासी बहुल भागात कडया–कपाऱ्यात, वस्त्या–तांडयांवर व पोड–बिराडांवर कव्हरेज नसल्याने ऑनलाईन क्लॉस बोलाचीच कढी आणि बोलाचाच भात झाले. संपूर्ण भारत कागदोपत्री जसा साक्षर झाला त्याचप्रमाणे ऑनलाईन क्लॉसही दाखविल्या गेले. यामध्ये प्रामुख्याने नुकसान झाले ते खेडयातील दुर्गम आणि अतिदुर्गम भागातील गोर–गरिबांच्या मुलांचे. कोरोना काळात म्हणजे किमान दोन सत्र ते मुले शिक्षणपासून वंचित राहिले. शिक्षण ही निरंतर आणि अखंडित चालणारी प्रक्रिया आहे. कोरोना काळात बरीच मुले शिक्षणापासून वंचितच राहिली. शिक्षणात खंड पडल्याने केवळ त्यांची अभ्यासाची सवयच सुटली नाही तर रिकाम्या डोक्यात विविध सवयी लागल्या. तरीही मुले पास झाली, काहींचे ऑनलाईन पेपर घेतले. त्यांनी आपल्याच घरी मित्रमंडळींसोबत चहापन घेत घेत समुहाने पेपर दिले. पर्यायाने परीक्षेमधील मार्कांनी उच्चांक गाठला पण गुणवत्ता पार घसरली. कोरोना काळात तेच मुलं टिकले आणि

शिकले ज्यांच्याघरी शिक्षणाचे वातावरण होते, पैसा आणि पालकांप्रमाणे मुलांमध्येही क्षम निवडण्याची क्षमता होती.ज्यांच्याकडे शिक्षणाचे वातावरण नव्हते, जाणीव नव्हती ते मात्र पास झाले मात्र स्पर्धेच्या रेस मधून आणि शैक्षणिका वातावरणातून बाद झाले. शेवटी परी कोणत्याही ठिकाणी वा नौकरीकरिता कोरोनाचे पासिंग अंतिम नव्हते तर बुद्धीमत्ता चा निकष होता. पर्यायाने कोरोना नंतरच्या बुद्धीमत्ता चाचणीमधून मोठा विद्यार्थी वर्ग प्रवा पडला. कोरोनाची महामारी शैक्षणिक व्यवस्थेच्या मुळावरच अशी घाव घालणारी ठरली.

विद्यापीठीय विद्यार्थ्यांच्या बाबतीत कोरोनापूर्व विद्यार्थ्यांची शैक्षणिक प्रगती उत्तम होती कोरोनोत्तर काळातील भौतिक उपस्थिती तर कायम राहिली मात्र बौद्धिकता पार ढासळली कोरोनाकाळात ८०टक्के मार्क मिळविणारे विद्यार्थी कोरोनात्तर परीक्षांमध्ये जेमतेम आहे. गुण पाहून आनंदित झालेला विद्यार्थी प्रत्यक्ष जगतांना बेकार झाला आहे. कोरोनाने त्याची अभ्या जिद्द, चिकाटी आणि आशाच हिरावून घेतली आहे. फुगलेल्या गुणांनी वाढलेल्या आशा करपून गेल्या आहे. मागे तर जाता येत नाही पण पुढेही सरकण्यासाठी त्याच्यात बळ नाही. काळात दोन वर्षांचा पडलेला खंड हा केवळ दोन वर्षांचा राहिला नाही तर एका पिढीवर करणारा ठरला. दोन वर्षात शिक्षणापासून दूर राहिलेला विद्यार्थी आता कायमचा दूर गेला काही वयाधिक्याने या प्रवाहातूनच बाहेर फेकल्या गेले आहे.

कोरोना नंतर विद्यार्थ्यांमध्ये पडलेल्या गॅपमुळे ग्रामीण भागात शिक्षणाविषयी अनास्था नि होत आहे एक तर नोकर भरती नसल्याने शिकलेले मुले गाव–खेडयातच मिळेल ती कामे आहे शिक्षण घेवून जर शेवटी हीच कामे करायची असल तर कशासाठी शिक्षण? हे प्रश्न नि होणे स्वाभाविक आहे. विद्यार्थ्यांसमोरआदर्श राहिले नाहीत त्यातच कोरानाच्या महामारीने शिक्ष घाला घातल्याने मुलांमधील अध्ययनाची उर्मीच मारून टाकली आहे. कारण ज्या काळात करताही पास झाल्याने करण्याची आवश्यकताच वाटत नाही एकदा हरामाची सवय लागली की राम चालत नाही अशातली गत काहींची झाली आहे.आपला प्रवेश आणि निकाल टिकविण्या संस्था आणि शिक्षकही विद्यार्थ्यांची पुढल्या वर्गात केवळ 'भरती' करीत आहेत यातून खरे शि आणि शिक्षणातून विकास थांबला आहे.

कोरोना संपला. शाळा महाविद्यालये पूर्ववत सुरू झालीत. कोरोनाकाळात लॉकडॉउन ऑनलाईन शिक्षणासाठी मोबाईल लॅपटॉपची गरज होती मात्र आता वर्ग पूर्ण ऑफलाईन झाल्याने वास्तविक पाहता मोबाईलची गरज संपायला हवी होती. पण तसे झाले नाही. मोबा अत्यावश्यक झाला.दुधापेक्षाही मोबाईलचा खर्च तर वाढलाच शिवाय खाण्याच्या खर्चापे आजारांवरील खर्च वाढला.संस्कारक्षम वयात हातात मोबाईल आल्यामुळे आणि चांगल्या वाईटा चाट नसल्याने बुद्धीच्या सहज कलाप्रमाणे त्यातून चांगल्यापेक्षा वाईटच अधिक घेतल्या जात आ विविध गेम्सच्या आहारी जावून आत्महत्या आणि भ्रमनिरासाचे प्रकरणे वाढत आहेत. मोबाईलमु मुलांमधील चिडखोरपणा, रागावणे वाढले. हिंसक वृत्ती वाढली, डोळयांचे प्रश्न आता समोर ये लागले आहे. ब्रेनच्या समस्या जानवू लागल्या आहेत. मोबाईलने घरातील संवाद तोडला आ वांझोटया स्त्री सारखा केवळ हववक उवतदपदहए पिए सिसव हेच शिल्लक राहिले. आर्थिक बो वाढला.शिक्षणाची फी भरण्यासाठी आणि क्लॉसचा मॅसेच येण्यासाठी आधी रिचार्ज आवश्य ठरला. मोबाईल शिवाय लहान मुले जेवत नाही, मोबाईल शिवाय दुसरं काही पाहत नाही, बोल नाही,ऐकतही नाही. मोबाईलने ऑनलाईन शिक्षणापेक्षा फेसबुकवरील प्रेमाची प्रकरणे वाढली. मु आईवडिलांपासून तुटली. त्यांच्या संस्कारांपेक्षा मोबाईलचा प्रभाव अधिक झाल्याने लव्ह जिह सारखी प्रकरणे वाढली. पिढयांमधील अंतर वाढले. एकाच घरात राहून एकोपा नष्ट झाला मोबा सोबतीला आला. त्यामुळे जीविताचा धोकाही वाढला ही सगळी कोरानाचीच देण आहे. यात ग्रामी विद्यार्थी अधिक भरडला जात आहे. आजही भारत खेडयांमध्येच राहतो आहे. १३५ को लोकसंख्येपैकी ८०–९०टक्के ही गरीब आणि सर्वसाधारण गटातील आहे. या एवढया मोठ समुहावर कोरोनाचा प्रभाव व प्रकोप झाला. ही वस्तुस्थिती आहे. याचे दुष्परिणाम आता कुठे पुढे आहे, यायला सुरूवात झाली आहे.

कोरोनाने शैक्षणिक स्थितीगतीच बदलून टाकली आहे. गुरूकूल पद्धतीपासून कालपरवा प चालू असलेली शाळेतील प्रत्यक्ष संवादी शिक्षण व्यवस्थाच आता नष्ट होण्याच्या मार्गावर आ

ऑनलाईन क्लॉस आणि वर्क फ्राम होम ही संकल्पना रूजायला लागली आहे. वर्क फ्राम होम कोरोना काळात योग्य नि काही काळपर्यंत ठीक होते. मात्र त्याचे दुष्परिणाम आता जाणवायला लागले आहे. पूर्ववेळ घरात असल्याने कौटुंबिक वाद आणि मानसिक तणाव घराघरामध्ये दिसून येत आहे. त्याचप्रमाणे अजूनही आपण पूर्णत: ऑनलाईन शिक्षण घेण्यास आणि त्या तंत्र आणि पद्धतीला स्वीकारण्यास पात्र झालेलो नाही. तर आजही वय वर्ष ३० नंतरची पिढी हार्डकॉपीच वाचणारी आहे. तिला स्वॉफ्टकॉपीच्या वाचनाची सवय नसल्याने तिची आजहली प्रत्यक्ष पुस्तकांचीच मागणी आहे. प्रत्यक्ष पुस्तक वाचण्याचा आनंद हा स्क्रिनवर वाचल्याने मीळत नाही. मुसळधार पावसाचे पाणी जमीनीत न मुरताच निघून जावे त्याप्रमाणे स्वॉफ्टकॉपीचे होत आहे. अर्थात याचीही पुढे सवय लागेल मात्र तोपर्यंत या बिकट अवस्थेतून जाणे आलेच.

कोणतेही संकट अथवा माहामारी पूर्णकाळ राहत नसली तरी तिचे परिणाम समाजावर दुरगामी होत असतात. शिक्षण समाजाला आणि देशाला विकसित करण्याचे साधन आहे. अज्ञानी असलेला समाज आणि देश रसातळाला जायला फारसा वेळ लागत नाही. नेमके कोरोनाने शिक्षणावरच आघात केला आहे. त्यामुळे ग्रामीण भागीतील पिढीच बरबाद झाली आहे. शहरी आणि महाविद्यालयीन विद्यार्थ्यांवरही याचा फार मोठा दुष्परिणाम पहायला मिळतो. कोरोना हा आता भूतकाळ जरी झाला असला तरी त्याने वर्तमान खराब केले आहे व भविष्यावर त्याची काळी छाया पसरली आहे. याला निस्तारण्याचे आव्हाण आपल्या समोर आहे. यावर योग्य उपाय साधून बिघडलेली घडी पुन्हा दुरूस्त करावी लागेल.

मोबाईल किंवा इंटरनेटचे मायाजाल वाईट आहे असे नव्हे ती आजची आवश्यकता आहे. हे मान्य असल्याने मोबाईलला टाळता येणार नाही. मात्र त्याचा मर्यादित आणि योग्य वापर करायला आपण शिकलो पाहिजे. महाराष्ट्रातील काही ग्रामपंचायतींनी या संदर्भात अत्यंत मोलाचा निर्णय घेतला आहे. १८वर्षाआतील मुलांना मोबाईल वापरण्यावर बंदी आणि काही काळ संपूर्ण मोबाईल वापरण्यावरच बंदी या गावाने घातली आहे. हा अत्यंत स्तुत्य निर्णय आहे. जर हा निर्णय ग्रामपंचायत घेते असल्यामुळे तो संपूर्ण गावासाठी बंधनकारक आहे. याचाच अर्थ हा निर्णय लोकांच्या मनांनी घेतला आहे. मोबाईलच्या अतिरीक्त वापरासंदर्भात जोपर्यंत जनलोकामध्ये जाणीव निर्माण होणार नाही तोपर्यंत मुलांच्या हातातील मोबाईल बंद होणार नाही. दुसरे असे की ऑनलाईन क्लास ही सुद्धा आजची आवश्यकता झाली आहे. कारण माहितीची व्याप्ती वाढली असल्याने प्रत्यक्ष संवादी शिक्षण व्यवस्था आता कुचकामी ठरणार आहे. नवीन व्यवस्था तर आपल्याला स्वीकारावी लागणारच. मात्र तिच्या योग्य वापरावर आपण नियंत्रण ठेवू शकतो. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांचे कोरोनामुळे अधिकचे नुकसान झाले ही वस्तुस्थिती असली तरी आता नव्याने ही गॅप भरून काढण्यासाठी सर्वच स्तरावरून प्रयत्न व्हायला पाहिजे. कोरोना सारखी महामाही ही अचानक आल्याने आपल्याकडे तिचा प्रतिकार आणि त्यावर उपाययोजना करण्यासाठी आपण सक्षम नव्हतो. आपल्याकडील आर्थिक कमजोरी, कव्हरेज नसणे आणि ते हाताळणारे शिक्षण नसणे यामुळे आपण या महामारीत बौद्धीकदृष्टया काही काळापर्यंत का होईना विकलांग झालो होतो. यापुढे मात्र आपण या सोईसुविधा आधिच निर्माण केल्या पाहिजेत.

**निष्कर्ष :**

१.कोरोना—१९ काळात प्राथमिक शिक्षणावर अधिक परिणाम झाला.

२.ऑनलाईन क्लॉससाठी नेटवर्क, मोबाईल नव्हते. त्यामुळे बरेच विद्यार्थी शिक्षणापासून वंचित राहिले.

३.वर्क फ्राम होमने कौटुंबिक तणाव निर्माण झाला.

४.विद्यार्थ्यांमधील शिक्षणाची आशा कोरोनाने मारून टाकली.

2022-23

ISSN 2277 - 5730
AN INTERNATIONAL MULTIDISCIPLINARY QUARTERLY RESEARCH JOURNAL

# AJANTA

Volume - XII Issue - II April - June - 2023

ENGLISH & MARATHI PART - I

Peer Reviewed Refereed and
UGC Listed Journal No. 40776

Single Blind Review / Double Blind Review

ज्ञान-विज्ञान विमुक्तये

IMPACT FACTOR / INDEXING
2023 - 7.428
www.sjifactor.com

❖ EDITOR ❖
Asst. Prof. Vinay Shankarrao Hatole
M.Sc (Maths), M.B.A. (Mktg.), M.B.A. (H.R.),
M.Drama (Acting), M.Drama (Prod. & Dir.), M.Ed.

❖ PUBLISHED BY ❖

Ajanta Prakashan
Chhatrapati Sambhaji Nagar (Aurangabad.)

VOLUME - XII, ISSUE - II - APRIL - JUNE - 2023
AJANTA - ISSN 2277 - 5730 - IMPACT FACTOR - 7.428 (www.sjifactor.com)

# CONTENTS OF MARATHI PART - I


| अनु. क्र. | लेख व लेखकाचे नाव | पृष्ठ क्र. |
|---|---|---|
| १ | ज्ञानमीमांसेत भाषा व अर्थाचे महत्त्व<br>**डॉ. वेदप्रकाश डोणगावकर** | १-४ |
| २ | भारतीय राजकारणात सोशल मिडियाची भूमिका<br>**प्रा. समाधान नारायण दराडे** | ५-९ |
| ३ | गंगापूर तालुक्यातील आसेगाव केंद्राचा "पायाभूत साक्षरता व गणितीय क्षमता विकास" कार्यक्रमांतप्रत अध्ययन स्तर निश्चिती विकसनासाठी १०० दिवसांच्या कृती कार्यक्रमाचा तुलनात्मक अभ्यास<br>**श्री. गणेश सिताराम चव्हाण**<br>**प्रा. डॉ. फिरोज शेख सर** | १०-१४ |
| ४ | कणा: तिन्ही त्रिकाळ प्रेरणा देणारी अक्षर कविता<br>**डॉ. विजयकुमार शिवदास ढोले** | १५-१९ |
| ५ | महाविद्यालयीन विद्यार्थ्यांचा मोबाईलचा वाढता वापर आणि त्याचे आरोग्यावर होणारे दुष्परिणाम: एक समाजशास्त्रीय अध्ययन<br>**प्रा. शीला भावजी दाभाडे (रोकडे)** | २०-२३ |
| ६ | रत्नागिरी जिल्ह्यातील बँक व विमा कंपन्याचे पुनरावलोकन १९०० ते १९६०<br>**डॉ. सत्येंद्र विजय राजे** | २४-२७ |
| ७ | स्त्री अस्मिता आणि बॉलीवूड चित्रपट<br>**डॉ. वैशाली दिवाकर** | २८-३४ |
| ८ | लयसिद्धांताबाबत शरच्चंद्र मुक्तिबोधांचे विचार<br>**प्रा. प्रमोद नारायणे** | ३५-४० |
| ९ | महात्मा गांधीजीचे राष्ट्रवादासंबंधी विचार<br>**सहा. प्रा. लक्ष्मण बाबाराव यादव** | ४१-४४ |

VOLUME - XII, ISSUE - II - APRIL - JUNE - 2023
AJANTA - ISSN 2277 - 5730 - IMPACT FACTOR - 7.428 (www.sjifactor.com)

# ९. महात्मा गांधीजीचे राष्ट्रवादासंबंधी विचार

**सहा. प्रा. लक्ष्मण बाबाराव यादव**
बा. दे. पारवेकर महाविद्यालय, पारवा.

**प्रस्तावना**

आधूनिक भारताच्या जडण घडणीत विशेषता भारताच्या स्वातंत्र्य लढ्यात महत्वाची भुमिका बजावल्यामुळे राष्ट्रपिता म्हणून ओळखले जाणारे ते केवळ राजकीय नेते नव्हते. तर एक समाजसुधारक, अध्यात्मिक साधक व सत्यशोधक, म्हणून त्यांना ओळखले जाते. गांधीजींच्या व्यक्तीमत्वाचे विविध पैलू दिसून येतात. त्यांचे चिंतन आदर्शवादी व व्यावहारीक असे दोन्ही प्रकारचे होते. "महात्मा गांधी हे राजकीय तत्वज्ञ नसुन त्यांनी दिलेली भाषने आणि केलेले लिखान हे तत्कालीन परिस्थीतीतुन मांडलेले विचार होते."

अशा या थोर महापुरूषांचा जन्म गुजरात मधील पोरबंदर येथे वडील करमचंद व आई पुतळीबाई यांच्या पोटी २ ऑक्टोंबर १८६९ रोजी झाला. त्यांचे पूर्ण नाव मोहनदास करमचंद गांधी असे होते. भारत पारतंत्र्यात असताना ब्रिटीशांच्या विरोधात सत्य, अहिंसा, सत्याग्रह व सविनय कायदेभंग या सारख्या शांततामय मार्गाचा अवलंब करून ब्रिटीशांना भारतातुन हाकलुन लावणारे व १५ ऑगस्ट १९४७ रोजी भारताला स्वातंत्र्य मिळवून देणारे राष्ट्रपिता महात्मा गांधी हे सर्व परिचीत आहेत. गोपाळ कृष्ण गोखले हे महात्मा गांधी यांचे राजकीय गुरू होते. गांधीजीनी त्यांच्या कडून शांततामय मार्गाची व सनदशिर चळवळीची प्रेरणा घेतली व याच्या आधारेच परकीय जुलमी राजवटी विरोधात संघर्ष उभारला. अशा या महान विचारवंताचा मृत्यु ३० जाने १९४८ रोजी झाला. प्रस्तुत शोध निबंधात महात्मा गांधी यांच्या राष्ट्रवादी विचारांचा अभ्यास केला जात आहे.

**राष्ट्रवादासंबंधी विचार**

महात्मा गांधी यांनी त्यांच्या जिवनात ज्या काही समस्या उद्‌भवल्या, त्या सोडविण्यासाठी त्यांनी जे काही निर्णय घेतले किंवा व्यवहारात प्रयोग केले. त्यांचा समावेश गांधीवादात होतो. महात्मा गांधीजींचे राष्ट्रवादासंबंधीचे विचार हे गांधीवादापासुन वेगळे करता येत नाहीत. कारण गांधीजींनी राष्ट्रवादासंबंधीचे विचार स्वातंत्र पणे मांडलेले नाहीत. त्यांचे राष्ट्रवादासंबंधी विचार समजुन घेत असताना, त्यांची विचारधारा आणि त्यांचे संपूर्ण तत्वज्ञान याचा अभ्यास करणे आवश्यक आहे. त्यांचे राष्ट्रवादासंबंधी विचार भारताच्या स्वातंत्र्य लढ्यामध्ये सामावलेले दिसून येतात. या विषयावरील त्यांचे विचार समजून घेण्यासाठी दोन गोष्टी लक्षात घ्याव्या लागतील. त्या म्हणजे गांधीच्या हृदयातील राष्ट्रवाद नावाचे रोप भारतात नाहीत. तर दक्षिण आफ्रिकेत उमलेले आहे. आणि हीच वस्तूस्थिती त्यांना इतर भारतीय राष्ट्रवाद्यापेक्षा वेगळे करणे. दुसरे म्हणजे ट्रान्सवालच्या राजकीय पार्श्वभुमीवर सत्याग्रह, स्वराज्य, रामराज्य, धर्म आणि राजकारण राज्यासंबंधी विचार, लोकशाही संबंधीचे विचार, सत्तेचे विकेंद्रीकरण, चंपारण्य सत्याग्रह, खेडा सत्याग्रह, असहकार आंदोलन, दांडी

VOLUME - XII, ISSUE - II - APRIL - JUNE - 2023
AJANTA - ISSN 2277 - 5730 - IMPACT FACTOR - 7.428 (www.sjifactor.com)

यात्रा, सायमन कमिशन, जालीयनवाला बाग हत्याकांड, आयर्विन करार, द्वितीय गोलमेज परिषद, द्वितीय महायुध्द, क्रिप्स मिशन योजना, भारताची फाळनी इत्यादी घटनेमध्ये त्यांच्या राष्ट्रवादाची कोणतीही ठोस कल्पना दिलेली नाही. त्यामुळे गांधीच्या दृष्टीकोनातून राष्ट्रवाद समजून घेण्यासाठी संपूर्ण गांधीवादी साहित्याच्या अभ्यास करणे आवश्यक आहे. त्यांच्या राष्ट्रवादाचे घटक पूढिल प्रमाणे.

**१. सत्याग्रह**

सत्याग्रह, अन्याय, शोषण, यांच्याविरूध्द लढण्याचे एक क्रांतीकारी शस्त्र आहे. सत्याग्रह जीवनातील विविध समस्या व संघर्ष निवारण करणारे एक साधन आहे. गांधजींनी अहिंसा या सिध्दांतास मुर्त रूप देण्यासाठी राजकीय क्षेत्रात ज्या कार्यपध्दतीचा वापर केला ते साधन म्हणजे सत्याग्रह होय. महात्मा गांधीच्या राष्ट्रवादी विचारात ही एक सर्वण्याची मुलभुत संकल्पना आहे. ज्यांचा वापर प्रत्येक क्षेत्रात केला जातो.

**२. रामराज्य**

महात्मा गांधीजींनी पूर्ण आयुष्यभर आत्मबल आणि आत्मशुध्दीच्या आधारे कार्य केले. त्यांच्या मते रामराज्य म्हणजे आदर्श राज्य ते राज्य कोणत्याही एका विशिष्ट जातीचे अथवा धर्माचे नव्हते तर ते नैतिक व मर्यादेवर आधारित एक असे राज्य आहे. की ज्यात धर्म, जात, लिंग, प्रांत व भाषा या कोणत्याही आधारे भेदभाव करत नाही. १९२९ मध्ये 'यंग इण्डियात' महात्मा गांधींनी स्पष्ट केले की, राम राज्याचा अर्थ हिंदु राज्य नाही. राम या पृथीवर असतील अथवा नसतील रामराज्याचा प्राचिन आदर्श निःसंदेह एक खरे लोकतंत्र आहे. ज्यात गरिबातील गरिब नागरिकांना न्याय मिळाला पाहीजे. असे त्यांना अपेक्षीत होते. यातुनच त्यांनी भारतासाठी सर्वसमावेशक राष्ट्रवाद मांडले.

**३. स्वराज्य**

गांधीजींनी स्वराज्या संबंधी विचार आपल्या "हिंद स्वराज्य" या ग्रथांत मांडले स्वराज्याचा अर्थ "आत्मशासन" आणि "आत्मसंयम" प्रत्येक देशाची सामाजिक, सांस्कृतीक, धार्मिक आणि राजकीय परिस्थीती भिन्न असते. आपल्या देशातील परिस्थीती विचारात घेवून सर्वसमावेशक शासन चालवले पाहीजे. अशा स्वराज्यात जाती–धर्म, गरिब–श्रिमंत, स्पृश–अस्पृश, स्त्री–पुरूष असा भेद असणार नाही. तेच खरे स्वराज्य होय. निस्वार्थ भावनेने चालवले जाणारे राज्य म्हणजे स्वराज्य होय.

**४. धर्म आणि राजकारण**

गांधीजींनी धर्म आणि राजकारण यात राजकीय समन्वय निर्माण करण्याचा प्रयत्न केलेला आहे. धर्मात राजकारणाचा प्रवेश गांधीना मान्य आहे. परंतु राजकारणात सांप्रदायीकतेचा प्रवेश गांधीना मान्य नाही. गांधीजींनी राजकारणामध्ये धार्मिक नितीमत्तेला जास्तीत जास्त महत्व देउन एकसंघ राष्ट्रवादाचा पाया मजबुत करण्याचा प्रयत्न केल्याचे दिसुन येते.

**५. लोकशाही संबंधी विचार**

महात्मा गांधीजींच्या मते 'आधुनिक कालखंडात लोकशाहीच्या विकासाबरोबरच तीचा अर्थ अधिक व्यापक बनला आहे'. भारतातील लोकशाही ही निर्दोष, सर्वसमावेशक व यशस्वी पणे चालवायची असेल तर महात्मा गांधीनी मांडलेल्या विचाराच्या आधारे म्हणजेच गांधीवादाच्या आधारे लोकशाही चालवली पाहिजे.

**६. राज्यासंबंधी विचार**

महात्मा गांधीचे राष्ट्रवादासंबंधी विचार स्पष्ट करत असताना गांधीजीचे राज्यासंबंधी विचार परंपरावादी आणि स्वराज्यवादी विचारवंतापेक्षा राज्यासंबंधीचे विचार वेगळ्या पध्दतीने मांडले आहेत. यासंबंधी जॉन वी. बोदस म्हणतात की, 'गांधीजी कार्ल मार्क्स प्रमाणे राज्यविरहीत वर्गविरहीत समाजाची स्थापना करू इच्छित होते'. म्हणजेच त्यांच्या राज्यात कोणत्याही प्रकारची राजकीय शक्ती असणार नाही. कारण त्यात राज्य असणार नाही. गांधीच्या मते राज्य एक अनैतिक संस्था आहे. राज्याला साध्या ऐवजी लोककल्यानाचे साधन मानतात. राज्याच्या सार्वभौमत्वा ऐवजी जनतेच्या सार्वभौमत्वाचे समर्थन करतात. यावरून महात्मा गांधीजींनी व्यक्तीला सर्व श्रेष्ठ मानुन राज्याला गौण मानले. यातून गांधीजींची राष्ट्रवादासंबंधीची दिशा स्पष्ट होते.

**७. सत्तेचे विकेंद्रीकरण**

महात्मा गांधीजीच्या राष्ट्रवादाचा सर्वात महत्वाचा घटक म्हणजेच सत्ता विकेंद्रीकरण होय. राज्यात सत्तेचे केंद्रीयकरण झाले. तर व्यक्तीच्या व्यक्ती स्वातंत्र्यावर मर्यादा येईल. व्यक्ती स्वातंत्र्य धोक्यात येईल. राज्याची एकाधिकार शाही अस्तित्वात येईल. थोडक्यात गांधीजींच्या मते देशात राष्ट्रवाद रूजवायचा असेल तर सर्वसमावेशक आणि जनतेचे कल्याण करणारे शासन प्रस्थापीत झाले पाहीजे.

**महात्मा गांधी आणि स्वातंत्र्य आंदोलन**

